शिक्षण विभाग (प्राथमिक ) जिल्हा परिषद, नांदेड
रेल्वे स्टेशन रोड,जिल्हा व सत्र न्यायालया समोर
वजिराबाद, नांदेड ४३१६०१.
वेबसाईट -: www.zpnanded.in
ई-मेल -: ssananded1@gmail.com

जाक्र./जिपनां/ शिअप्रा/प्रा-१अ/२०२४/ 691 दिनांक: 24 JAN 2024

**प्रति,**
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती सर्व,
जिल्हा परीषद, नांदेड.

**विषय :- नांदेड जिल्हा परीषद, शिक्षण विभाग प्राथमिक अंतर्गत उच्चश्रेणी मुख्याध्यापक, प्राथमिक शिक्षक-मराठी/उर्दू, पदवीधर शिक्षक- भाषा/गणित /विज्ञान/ सामा.शास्त्र-माध्यम-मराठी व उर्दू ,केंद्रप्रमुख इ. संवर्गाची प्राथमिक सेवाज्येष्ठता यादी- २०२४ हरकती व आक्षेपासाठी प्रसिध्द करणेबाबत.**

उपरोक्त विषयानुषंगाने आपणास सूचित करण्यात येते की, नांदेड जिल्हा परीषद शिक्षण विभाग प्रा अंतर्गत **मुख्याध्यापक,प्राथमिक शिक्षक-मराठी/उर्दू, पदवीधर शिक्षक- भाषा/गणित /विज्ञान/ सामा.शास्त्र-माध्यम-मराठी व उर्दू ,केंद्रप्रमुख** इ. संवर्गाची प्राथमिक स्वरूपातील सेवाज्येष्ठता यादी -२०२४ प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर सर्व संवर्गाची सेवाज्येष्ठता यादी सर्व अधिनिस्त अधिकारी/शिक्षक/कर्मचारी यांचे नजरेस आणून देण्यात येवून यादीतील माहिती बाबत काही आक्षेप व हरकती असल्यास पुराव्या निशी आक्षेप आपल्या स्तरावर संकलीत करून योग्य आक्षेप दुरुस्तीसह अंतीम यादी या कार्यालयास सादर करणे आदेशित करण्यात येत आहे.

सदर प्राथमिक स्वरूपातील सेवाजेष्ठता यादी सर्व कर्मचारी यांचे निदर्शनास येणेस्तव पंचायत समिती स्तरावर उपलब्ध करून देणेबाबत कार्यवाही करावी. सेवाजेष्ठता यादी आपल्या स्तरावर नोटिस बोर्डावर लावून प्रसिध्द करुन अवगत करावी.

सेवाजेष्ठता यादी जिल्हा परीषद नांदेडचे संकेतस्थळ www. zpnanded.in वर उपलब्ध करण्यात आली आहे. तालुकास्तरावर केंद्रनिहाय कॅम्पलावून जेष्ठता यादीतील आक्षेप घेणे व त्यावर संबधीताची स्वाक्षरी घेणे ,यादीतील मयत,पदोन्नती झालेली,आजिब गेलेले,सेवानिवृत्ती झालेले,स्वेच्छा निवृत्ती झालेले शिक्षकं यांची नांवे असतील तर ती वगळणे. (कारणासह) व जेष्ठता यादीत ज्यांची नावे समाविष्ट नाहीत ती नावे यादीत शेवटी समाविष्ट करणे. तसेच यादीतील नोंदी बरोबर असल्याबाबतचे मु.अ.चे प्रमाणपत्र ग.शि.अ. यांनी घेणे व आपल्या स्तरावर जतन करणे. तसेच विस्तार अधिकारी (शिक्षण) व केंद्रप्रमुख यांना जबाबदारी देवून कॅम्पचे आयोजन करणे.

**पान क्रं. २...**

तालूक्यातील एकाही शिक्षकाचे नावे यादीत समाविष्ट होण्यापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. यादीतील नोंदी बाबत कोणत्याही चुका किंवा चुकीची माहितीची नोंद होणार नाही याबाबत दक्षता घेणे व चुकीची माहिती नोंदवली असेल तर त्याबाबत जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

| अ.क्र | दिनांक | मुद्दे | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २५.०१.२०२४ ते ०८.०२.२०२४ | प्राथमिक यादी तालुका स्तरावर प्रसिध्द करणे,केंद्रनिहाय कॅम्प लावणे, आक्षेप घेण, दुरुस्ती करणे, मु.अ.चे प्रमाणपत्र घेणे ई अनुषंगीक कामे. | शाळास्तरावरील कॅम्पचे नियोजन गशिअ यानी आपल्यास्तरावर करणे |
| २ | ०९ ते १२ फेब्रु.२०२४ | तालुकास्तरावर संकलन करुन यादी अदयावत करणे. | |
| २ | १४.०२.२०२४ | जिल्हा स्तरावर सॉफ्ट व हॉर्ड कॉपी प्रमाणपत्रासह प्रस्ताव सादर करणेसाठी काम करणारे कर्मचारी यांना प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित राहणेस्तव आदेशीत करणे. | |

दिनांक -

**प्रमाणपत्र**

**प्रमाणित करण्यात येते की, नांदेड जिल्हा परीषद शिक्षण विभाग प्रा अंतर्गत उच्चश्रेणी मुख्याध्यापक, प्राथमिक शिक्षक-मराठी/उर्दू, पदवीधर शिक्षक- भाषा/गणित/विज्ञान/ सामा.शास्त्र-माध्यम-मराठी व उर्दू, केंद्रप्रमुख इ. संवर्गाची सेवा जेष्ठता यादी सर्व शिक्षक यांचे मूळ सेवापुस्तिका यांतील नोंदी पडताळून तयार करण्यात आलेली आहे. सदर यादी बिनचूक असून त्यातील नोंदी हया अचूक आहेत .प्रसिध्दीनंतर प्राप्त हरकती व आक्षेप यांचे रितसर निराकरण करण्यात आले असून योग्य आक्षेप रितसर नोंदवण्यात आले आहेत भविष्यात काही समस्या उदभवल्यास मी स्वत जबाबदार राहीन.**

गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती-----

**सोबत –प्राथमिक सेवाज्येष्ठता यादी-२०२४**

**प्रतिलीपी,**

१.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.नांदेड,यांना माहितीस्तव सविनय सादर.

24/1/2024

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)**
जिल्हा परिषद नांदेड